






म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
IRBK-0106271
IRBK-0106271

# कथासरित्सागर

## शापभ्रष्ट श्रीदर्शन

प्र. शं. जोशी



कथासरित्सागर : ८

# शापभ्रष्ट श्रीदर्शन

प्र. शं. जोशी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

IRBK-0106271

४० नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे
पहिली आवृत्ति : १९५७
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धन कवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकें लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानें आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोंत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

मृगांकदत्त हा पारावत नांवाच्या एका नागराजाच्या शापा-मुळें आपल्या मित्रांना मुकला होता. विचित्रकथ नांवाचा त्याचा एक मित्र घनदाट अरण्यांतून भटकत असतां एका दिव्य नगराला आला. मृगांकदत्ताची भेट होत नाहीं या कल्पनेनें जिवाला कंटाळून तो प्राण द्यायला तयार झाला असतां, आपल्या दोन प्रियांसह तेथें आलेल्या एका दिव्य पुरुषानें त्याला त्या गोष्टीपासून परावृत्त केलें व 'यक्ष असूनहि आपल्याला कसें दुःख सहन करावें लागलें' तें सांगितलें. तीच हकीकत 'श्रीदर्शन' या कथेंत आली आहे.

या कथेंत 'श्रीदर्शना'च्या तीन जन्मांची माहिती दिली आहे. पहिल्या जन्मीं तो 'कालभर्ग' नांवाचा एक ब्राह्मण असून पथ्या व बला या त्याच्या दोन पतिव्रता पत्नी होत्या. 'जन्मोजन्मीं आपलें हेंच नातें असावें' अशी प्रार्थना करून त्या तिघांनींहि अग्निकुंडांत उड्या घेतल्या व पुढील जन्मीं कालगर्भ 'दीप्तिशिख' नांवाचा यक्ष बनला व पथ्या आणि बला या 'धूमलेखा' आणि 'ज्योतिलेखा' नांवाच्या यक्षिणी बनल्या. नलकूबराच्या शापामुळें दीप्तिशिखाला मृत्युलोकांत जन्म घ्यावा लागला व तो 'श्रीदर्शन' या नांवानें प्रसिद्धीस आला. धूमलेखा आणि ज्योतिलेखा या पद्मिष्ठा आणि अनंगमंजिरी यांच्या रूपानें भूतलावर अवतरल्या. पूर्वजन्मींची आठवण करून दिल्यानंतर सर्वांनाच यक्षजन्म प्राप्त झाला. हें कथानक कलात्मक रीतीनें या गोष्टींत गुंफलें आहे. कथासरित्सागराच्या बाराव्या लंबकांतील सहाव्या तरंगांतून ही कथा घेतली आहे.

# शापभ्रष्ट श्रीदर्शन

## पवित्रधराला सौदामिनीची प्राप्ति

प्राचीन काळीं भरतखंडात त्रिगर्ता नांवाची एक विशाल व सुंदर नगरी होती. ती नगरी म्हणजे विद्येचें माहेरघरच होतें. दूरवरचे लोकहि विद्याभ्यासासाठीं त्या नगरींत येत असत. पवित्रधर नांवाचा एक अत्यंत विद्वान ब्राह्मण तेथें रहात होता. त्याचें घर श्रीमंतांच्या वस्तींत होतें पण त्याच्या घरीं मात्र अठरा विश्वे दारिद्र्य भरलेलें. श्रीमंतांना मिळणाऱ्या सुखाचा त्याला हेवा वाटत असे. पण लबाडीनें किंवा खोटेपणानें पैसे कमावणें त्याला पसंत नसल्यामुळें व सेवावृत्तीची त्याला प्रथमपासूनच चीड असल्यानें लक्ष्मीची त्याच्यावर कधींहि कृपादृष्टि झाली नाहीं. मानी स्वभावामुळें कोणाकडून दान घेणेंहि त्याच्या जिवावर येई. त्यामुळें त्याच्या मनाचा फार मोठा कोंडमारा होई.

अखेर खूप विचार करून श्रीमंत होण्याचा उपाय त्यानें शोधून काढला. त्याच्या गुरूनें 'यक्षसाधन' नांवाचा एक मंत्र त्याला शिकविला होता. त्या मंत्राचा जप करून तपश्चर्या केली असतां एखाद्या यक्षाला किंवा यक्षिणीला वश करून घेणें शक्य होतें. यक्षांना अनेक सिद्धि प्राप्त झालेल्या असतात. तेव्हां त्यांचा उपयोग करून घेऊन हवें तितकें वैभव कमावणें कांहीं अशक्य नव्हतें. त्याचा निश्चय ठरला. तो तपश्चर्येसाठीं एका निबिड अरण्यांत गेला. तेथें केवळ कंदमुळें व फळें भक्षण करीत तो सतत यक्षसाधन-मंत्राचा जप करण्यांत गढून गेला. अशा तऱ्हेनें अनेक दिवस जप केला असतां सौदामिनी नांवाची एक यक्षिणी त्याला वश झाली व त्याची पत्नी होण्याचें तिनें कबूल केलें. यक्षिणीनें आपल्या सिद्धीच्या सामर्थ्यानें असंख्य मूल्यवान् रत्नांचा खजिना

त्याला मिळवून दिला. पवित्रधराजवळ आतां खूप पैसा झाला. तो भव्य वाड्यांत यक्षिणीसह अनेक सुखांचा आस्वाद घेत दिवस घालवूं लागला. श्रीमंतांनाहि त्याच्या सुखाचा हेवा वाटावा अशी स्थिती निर्माण झाली

● ● ●

## सौदामिनीचें भविष्यकथन

दोघांचा संसार अत्यंत सुखानें चालला असतांहि कसली तरी चिंता पवित्रधराला बेचैन करून टाकीत असे. एके दिवशीं तो असाच चिंताग्रस्त होऊन बसला असतां सौदामिनी तेथें आली. विचारांच्या तंद्रींतून जागें करीत तिनें त्याला विचारलें, "महाराज! मी जवळ असतांना आपल्याला कसली काळजी लागून राहिली आहे? आपण मला सांगा. मी ती लागलीच दूर करीन." तिचे ते शब्द ऐकून पवित्रधर ओशाळल्यासारखा झाला. तो म्हणाला, "प्रिये! तूं आपल्या सिद्धीमुळें कांहींहि करूं शकशील. कोणत्याहि संकटांतून तूं मला तारून नेशील. कोणतीहि असाध्य वस्तु तूं मिळवून देशील. पण मला काळजी लागली आहे ती दुसऱ्याच एका गोष्टीची. आपल्या विवाहाला चार-पांच वर्षें झालीं. पण अजूनहि आपल्याला मूलबाळ नसल्यानें मी पितृऋणांतून मुक्त होईन कीं नाहीं याची मला नेहमीं काळजी वाटते." त्याचे हे शब्द ऐकून धीर देत सौदामिनी त्याला म्हणाली, "महाराज! आपण मुळींच काळजी करूं नका. आपल्याला पृथ्वीवर अधिराज्य गाजविणारा पुत्र लवकरच होणार आहे. तो आपणाला पितृऋणांतून मुक्त करील." सौदामिनीच्या शब्दावर त्याचा विश्वास होता. त्यामुळें ती बातमी ऐकून त्याला खूप आनंद झाला. "आपल्याला पुत्र होणार असून तो पृथ्वीवर साम्राज्य स्थापन करणार हें तुला कसें समजलें?" असें त्यानें सौदामिनीला खोदून खोदून विचारण्यास सुरुवात केली.

● ● ●

## सौदामिनीकरितां अट्टहास विद्याधराची निवड

सौदामिनीला त्या बाबतींत कांहीं सांगण्याची इच्छा नव्हती. तथापि पतीचा आग्रह पाहून ती सांगूं लागली :

महाराज ! मी माझ्या वडिलांच्या विमानांतून मैत्रिणींसह दूरच्या पर्वतावरील दिव्य उपवनांत खेळण्यासाठीं जात असें. एकदां मी दक्षिणेकडील पर्वतावर गेलें असतां, तेथील उपवनांत अट्टहास नांवाचा एक अत्यंत सुंदर यक्ष माझ्या दृष्टीस पडला. त्याच वेळीं त्याचेंहि लक्ष माझ्याकडे गेलें. माझ्याकडे पाहून त्याचें मन अस्वस्थ झाल्यासारखें दिसलें. मलाहि प्रथमदर्शनींच त्यानें वेड लावलें. माझी ती अवस्था माझ्या मैत्रिणीच्या लक्षांत आली. आम्हां दोघांची ओळख होण्यापूर्वींच आपलें काम आवरून माझे वडील तेथें आले व आम्हांला घरीं परतणें भाग पडलें. मी घरीं आलें पण माझें कशांतच लक्ष लागेना. माझी ती अवस्था आईवडिलांच्या लक्षांत आली. त्यांनीं माझ्या मैत्रिणीकडे चौकशी केली. तेव्हां तिनें घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली. वडिलांना अट्टहासाच्या घराण्याची चांगली माहिती होती. अट्टहासालाहि त्यांनीं त्या उपवनांत ओझरतें पाहिलें होतें. तो मला अनुरूप पति आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं एका सेवकाला पाठवून अट्टहासाला बोलावून घेतलें व त्याचा कल पाहून आमच्या विवाहाचा मुहूर्त नक्की केला. ती आनंदाची बातमी सांगण्यास अट्टहास आपल्या घरीं निघून गेला.

• • •

## अट्टहासाला नलकूबराचा शाप

विवाहाला अद्यापि बरेच दिवस होते. त्या अवधींत मनाची कांहीं-तरी करमणूक करावी म्हणून अट्टहास आपल्या मित्रांबरोबर हिमालयाच्या

शिखरांवर खेळायला गेला होता. त्यांच्या खेळांत मित्रांनीं त्याला ‘ यक्षांचा राजा कुबेर ’ केलें व त्याचा भाऊ दीप्तिशिख याला ‘ राजपुत्र नलकूबर ’ बनविलें. त्यांचा खेळ रंगांत आला होता. त्याच वेळीं नलकूबर आकाशांतून चालला होता. त्याच्या लक्षांत ही गोष्ट आली. आपली व आपल्या वडिलांची हे लोक चेष्टा करीत आहेत या कल्पनेनें तो खूप रागावला. आकाशांतून खालीं उतरून तो मोठ्या रागानें अट्टहास व दीप्तिशिख यांना म्हणाला, “ चाकर ते चाकर आणि तुम्ही माझ्या वडिलांची व माझी चेष्टा करतां काय ? तुम्हांला उच्चपदाची इच्छा झालेली दिसते पण दुष्टांनो ! या उद्धट वर्तनामुळें तुम्हांला नीच योनींत जन्म घ्यावा लागेल. ” कल्पना नसतांना मध्येंच उद्भवलेला हा प्रसंग पाहून अट्टहासाला वाईट वाटलें. त्यानें परोपरीनें नलकूबराची विनवणी केली. त्याची किंवा त्याच्या वडिलांची चेष्टा करण्याचा विचारहि आपल्या मनांत नव्हता हें त्यानें अनेकदां सांगितलें. तेव्हां नलकूबरानें अंतर्ज्ञानानें त्यांच्या मनांतील हेतु जाणला व त्यांनीं हेतुपुरस्सर गुन्हा केला नाहीं हें कळून आल्यावर तो अट्टहासाला म्हणाला, “ ज्या सौदामिनीच्या आठवणीनें तूं अस्वस्थ झालास व मनाला विरंगुळा देण्यासाठीं हा खेळ खेळत होतास, ती यक्षीण तुला आतां मनुष्यजन्मांत प्राप्त होईल. हा तुझा भाऊ तिच्या पोटीं जन्माला येईल व आपल्या पराक्रमानें सम्राट राजा होईल. त्याच्या जन्मानंतर तुला यक्षाचें रूप प्राप्त होईल व सौदामिनीसह तूं यक्षलोकाला येशील. ” असें सांगून नलकूबर निघून गेला. हा सर्व प्रसंग घडत असतां माझी मैत्रिण कपिशभ्रू त्या ठिकाणीं होती. तिनें ही हकीगत जेव्हां मला सांगितली, तेव्हां दुःखानें माझें हृदय विदीर्ण झालें. वडिलांनीं माझें सांत्वन केलें व आपल्या प्रियकराची भेट लवकर घडून यावी म्हणून मी तपश्चर्या करण्यासाठीं एका आश्रमांत राहूं लागलें. तो अट्टहास म्हणजेच आपण. आपण केलेल्या यक्षसाधन-मंत्राच्या जपामुळें मृत्युलोकीं आपलें मीलन

वरून आलें. लवकरच आपणाला पुत्रसुखाचा लाभ होईल व आपली शापांतूनहि मुक्तता होईल.

सौदामिनीनें सांगितलेला हा सर्व वृत्तांत ऐकूनहि त्याला पूर्वजन्मींचें कांहींच स्मरण झालें नाहीं. पण तिच्या सांगण्यानें त्याची चिंता दूर झाली व तो संसारांत पूर्णपणें रमून गेला.

● ● ●

## पुत्रजन्मामुळें पवित्रधराला विद्याधरत्वाची प्राप्ति

कालांतरानें सौदामिनीनें एका तेजस्वी बालकाला जन्म दिला. ही आनंदाची बातमी कळतांच अट्टहास सौदामिनीच्या महालांत आला व मोठ्या उत्सुकतेनें त्यानें आपल्याला पितृऋणांतून मुक्त करणाऱ्या पुत्राचें दर्शन घेतलें. त्याच क्षणीं एका दिव्य रूप धारण करणाऱ्या यक्षामध्यें अट्टहासाचें रूपांतर झालें. तें पाहून त्याला अत्यंत आनंद झाला. त्याच्या पूर्वजन्मींच्या सर्व स्मृति जागृत झाल्या. तो सौदामिनीला म्हणाला, "प्रिये ! आज मी पितृऋणांतून मुक्त झालोंच. पण शापांतूनहि आज माझी मुक्तता झाली आहे. येथें कितीहि सुखें असलीं तरी मला आपल्या दिव्य भूमींत केव्हां जाईन असें होऊन गेलें आहे. तेव्हां याच्या पालनपोषणाचें काम दाईवर सोंपव व चल, आपण यक्षभूमीला जाऊं." अट्टहासाचे ते शब्द ऐकून सौदामिनी म्हणाली, "महाराज ! आपल्या मातृ-भूमीची ओढ किती असते याची मला कल्पना आहे. पण आपल्या बाळाला जन्मल्याबरोबर टाकणें माझ्या जिवावर आलें आहे. हा थोडा मोठा होऊं द्या. हा बोलूं चालूं लागला म्हणजे आपण जाऊं." सौदा-मिनीच्या या उत्तरानें त्याचें समाधान झालें नाहीं. तिला आपलें म्हणणें कसें पटवून द्यावें या विचारांत मात्र तो पडला.

● ● ●

## अग्निदेवाचा अट्टहासाला आदेश

त्याच वेळीं देवदर्शन नांवाचा एक ब्राह्मण, धन व पुत्र यांच्या प्राप्तीसाठीं पत्नीसह अग्निदेवाची उपासना करीत होता. प्रसन्न होऊन अग्निदेव त्याला म्हणाला, " वत्सा ! तुझ्या नशिबीं पोटचा मुलगा नाहीं. पण एखादा मानलेला मुलगा तुला लाभेल व त्याच्या प्रभावामुळें तुला खूप वैभवहि प्राप्त होईल. " असें म्हणून अग्निनारायण अंतर्धान पावला व अट्टहासाला दर्शन देऊन त्याच्या मुलाला देवदर्शनाच्या हवालीं करण्यास त्यानें सांगितलें. सौदामिनीच्या समक्ष अग्निदेवानें अट्टहासाला तो आदेश दिला होता. तेव्हां अट्टहास म्हणाला, " प्रिये ! तूंच पहा. अग्निदेवाची आज्ञा आपणास कशी मोडतां येईल ? शिवाय आपल्या बाळाला कळूं लागल्यावर सोडून दिलें, तर तो आकान्त करील. तेव्हां याला आतांच आपण देवदर्शनाच्या घरीं पोहोंचवूं व याचे हाल होऊं नयेत म्हणून याच्याबरोबर हिऱ्यामाणकांनीं भरलेला सुवर्णकलशहि गुप्तपणें याच्या शेजारीं ठेवून येऊं. असें केलें असतां याच्या संगोपनाची आपल्याला काळजी करावी लागणार नाहीं. " सौदामिनीला त्याचें म्हणणें मान्य करावें लागलें. तिचा नाइलाज झाला. त्या रात्रीं अट्टहास अदृश्य होऊन आपुल्या मुलाला देवदर्शनाच्या घरीं घेऊन निघाला. तेव्हां सौदामिनीनें त्याचे पटापट मुके घेतले व आपल्या गळ्यांतील भारी किमतीची रत्नमाला त्याच्या गळ्यांत घालून त्याला अट्टहासाच्या हातीं सोंपविलें. अट्टहास गुप्तपणें ब्राह्मणाच्या घरीं आला. ब्राह्मण व त्याची पत्नी हीं गाढ झोंपीं गेलीं असतां त्यानें आपल्या मुलाला तेथें निजविलें व त्याच्या शेजारींच हिऱ्यामाणकांनीं भरलेला तो सुवर्णकलश ठेवला व तो आपल्या घरीं परत आला. नंतर सूर्योदयाच्या आंत तीं दोघेंहि यक्षभूमींतील अलकापुरीला निघून गेलीं.

• • •

### देवदर्शनाला पुत्रप्राप्तीचा आनंद

कांहीं वेळानें देवदर्शनाला जाग आली. त्या वेळीं अंधारांत लखलखत्या रत्नांच्या तेजानें आसपासचा भाग झळाळून निघाला होता. हा काय नवीन प्रकार म्हणून पहाण्यासाठीं तो उठला तोंच रत्नांच्या तेजानें अधिक तेजस्वी भासणाऱ्या व शांत झोंपीं गेलेल्या बालकाचें मुख त्याच्या दृष्टीस पडलें. शेजारीं असलेला सुवर्णकलशहि त्याला दिसून आला. तो पाहून त्याच्या आनंदाला व आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. अग्निदेवानेंच हा बालक व हें वैभव आपल्याला दिलें, अशा श्रद्धेनें तो अग्निदेवाचे अनंत उपकार मानूं लागला. त्यानें आपल्या पत्नीला जागें करून अग्निदेवानें दिलेला बालक व वैभव तिला दाखविलें. पुत्रप्राप्तीचा मोठा उत्सव त्यांनीं साजरा केला. चांगला मुहूर्त पाहून त्यांनीं त्या बालकाचें मोठ्या उत्सवानें 'श्रीदर्शन' असें नांव ठेवलें. श्रीदर्शनाबरोबर त्यांना खूप वैभव प्राप्त झालें होतेंच; पण त्याच्या पायगुणानें पुढेंहि त्यांना खूप पैसा मिळूं लागला. त्यांनीं यज्ञयागादि अनेक धार्मिक कृत्यें केलीं.

● ● ●

### देवदर्शनाचा तीर्थयात्रेंत अंत

श्रीदर्शन आपल्या बाललीलांनीं आपल्या आईवडिलांचें मन सुखवीत होता. त्याला खेळविण्यांत त्या दोघांचा वेळ कसा निघून जात असें हें कळतदेखील नसे. तीं दोघेंहि त्या लाडक्या बाळाचें कोडकौतुक करीत व सर्व लाड पुरवीत. तो थोडा मोठा झाल्यावर मोठ्या थाटानें त्यांनीं त्याची मुंज केली व अनेक विद्यांत पारंगत करण्यासाठीं त्यांनीं त्याला योग्य गुरूंच्या आश्रमांत ठेवलें. आपल्या बुद्धिवैभवानें त्यानें आपल्या अध्यापकांनाहि चकित करून सोडलें. वेदविद्यांमध्यें तो पारंगत झालाच; पण धनुर्विद्येमध्येंहि त्यानें नैपुण्य संपादन केलें. श्रीदर्शनानें आपला विद्याभ्यास पूर्ण केला. घरादाराची जबाबदारी सांभाळण्यास

क्रां. २२४८ दो. वि.

आतां तो पात्र झाला होता. त्याच्यावर ती जबाबदारी सोंपवून देवदर्शनानें आपल्या पत्नीसह तीर्थयात्रेला जायचें ठरविलें. त्या काळीं तीर्थयात्रा करणें फारच कष्टाचें होतें. त्यांतून वय झालेलें ! घरींच धार्मिक कृत्यें करीत आपल्या आईवडिलांनीं रहावें, असें श्रीदर्शनाला फार वाटत होतें. त्यानें त्याप्रमाणें त्यांना खूप विनंति करून पाहिली. पण हातपाय काम करतात तोंपर्यंत तीर्थयात्रा करून घ्यावी व राहिलेलें आयुष्य 'राम' 'राम' म्हणत घरीं घालवावें, असें देवदर्शनानें ठरविलें होतें. त्यानें आपल्या मुलाची समजूत काढली व पत्नीसह तो पायीं तीर्थयात्रेला गेला. म्हातारपणीं तीर्थयात्रेचे कष्ट त्याला सहन झाले नाहींत. प्रयागला आला असतां तो अत्यंत आजारी पडला व तेथेंच त्याचा अंत झाला. त्याच्या पत्नीनें ती बातमी घरीं कळविण्याची व्यवस्था केली व तीहि त्याच्या मागोमाग सती गेली. प्रयागहून आलेल्या कांहीं यात्रेकरूंकडून जेव्हां ही दुःखद बातमी श्रीदर्शनाला समजली, तेव्हां त्याचें दुःख असह्य झालें. त्याचा धीर खचला. काय करावें हें त्याला कळेना. मित्रांनीं त्याला धीर दिला. त्यानें शास्त्रोक्त विधीनें आपल्या आईवडिलांचे अंत्यसंस्कार पार पाडले. तरुण वयांत त्याला मार्गदर्शन करण्यास मात्र कोणी राहिलें नाहीं.

● ● ●

## श्रीदर्शनाची द्यूतामुळें धूळधाण

हळूहळू त्याचें दुःख कमी झालें. इतर गोष्टींत त्याचें मन रमूं लागलें. पण दुर्दैवानें त्याला वाईट मित्रांची संगत जडली. लग्न न झाल्या-मुळें संसाराचें बंधनहि त्याला उरलें नव्हतें. जुगारी मित्रांनीं त्याला घेरलें. तो जुगाराच्या पक्का आहारीं गेला. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. प्रथम प्रथम त्याला जुगारांत खूप पैसा मिळाला; पण शेवटीं मिळविलेला पैसा गेलाच, शिवाय वडिलांनीं घरीं कमावून ठेवलेलें होतें-नव्हतें तेंहि सर्व खलास झालें. तो इतका कंगाल झाला कीं कोणी दया

दाखविली तर त्याच्या पोटाला कांहींतरी मिळे. नाहीं तर इतरांपुढें तोंड वेंगाडूनहि उपाशी रहायची पाळी येई. जेवणाखाण्याची जी स्थिति तीच कपड्यालत्त्याची. त्याला एकहि धड कपडा राहिला नव्हता. फाटकीं लक्तरें घालून लोकांत जायला त्याला लाज वाटत असे. त्यामुळें तो चोवीस तास द्यूतशाळेंतच पडून राहिलेला असे. इतर जुगारी मित्र त्याला मुळींच विचारीत नसत. श्रीदर्शनाला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. प्रायश्चित्त म्हणून आमरण उपोषण करण्याचा त्यानें मनाशीं निश्चय केला.

• • •

## मुखरकाबरोबर देशान्तरास गमन

सतत तीन दिवस अन्नपाण्यावांचून तडफडत पडला असतांनाहि त्याची कोणीच चौकशी केली नाहीं. मुखरक नांवाच्या मित्राला मात्र त्याची ही अवस्था पहावली नाहीं. श्रीदर्शनाकडे येऊन तो म्हणाला, " बाबा रे ! आतां असा मनस्ताप करून घेण्यांत काय अर्थ आहे ? केव्हांना केव्हां जुगाऱ्याच्या नशिबीं हे दिवस लिहिलेलेच असतात. पण आपण हातपाय गाळून चालणार नाहीं. यांतूनहि मार्ग काढलाच पाहिजे. तेव्हां आतां प्रथम माझ्या घरीं चल, जेवण कर व नंतर पुढें काय करायचें तें ठरवूं. " मुखरकाचे हे जिव्हाळ्याचे शब्द ऐकून श्रीदर्शनाला गहिंवरून आलें. मुखरकानें फारच आग्रह धरला, तेव्हां श्रीदर्शन त्याला म्हणाला, " मित्रा, तूं म्हणतोस तें सर्व खरें आहे; पण बाहेर पडायचें म्हटलें तर धड वस्त्रहि माझ्या अंगावर नाहीं. यापुढें या गांवांतील लोकांपुढें तोंड वेंगाडण्यापेक्षां उपाशीपोटीं झुरून झुरून मरणें मला अधिक बरें वाटतें. मीं जिवंत रहावें असें तुला मनापासून वाटत असेल तर माझ्याबरोबर देशान्तर करायला तूं तयार रहा. माझी विनंति तूं मान्य करणार असशील तरच मी तुझ्या घरचें अन्न ग्रहण करीन. नाहीं

तर आजन्म उपोषण करून या कटकटींतून कायमचा सुटेन." श्रीदर्शनाचा हा निश्चय ऐकून मुखरकानें त्याच्या बरोबर देशान्तराला जायचें असें ठरविलें व 'द्यूतशाळेंतच जेवण घेऊन ये' असें श्रीदर्शनानें सांगितल्यावर मुखरकानें त्याची तीहि विनंति मान्य केली. वेळोवेळीं घडलेल्या उपवासामुळें व गेल्या तीन दिवसांत अन्नपाणी वर्ज्य केल्यामुळें श्रीदर्शनाचीं हाडें निवालीं होतीं. लांबचा प्रवास करण्याचें त्राण त्याच्यांत मुळींच उरलें नव्हतें. तरीदेखील मुखरकानें आणलेल्या जेवणांतून चार घांस खाऊन तो देशान्तराला जाण्यास तयार झाला. मुखरकाहि व्यापाराला जाण्याच्या निमित्तानें श्रीदर्शनाबरोबर प्रवासाला निघाला.

• • •

**प्रवासांतील आकाशवाणी**

ते दोघे प्रवास करीत असतां, त्याच वेळीं अट्टहास व सौदामिनी आकाशांतून संचार करीत कैलास पर्वताकडे चाललीं होतीं. अट्टहासाचें लक्ष सहज खालीं गेलें. त्यानें दिव्य दृष्टीनें श्रीदर्शनाला ओळखलें. त्याची ती अवस्था पाहून त्याला फार वाईट वाटलें. त्यानें सौदामिनीला जेव्हां पायीं चालत असलेला श्रीदर्शन दाखविला, तेव्हां तिला भडभडून आलें. त्याची ही दुरवस्था दूर करण्याबद्दल तिनें अट्टहासाला विनंति केली. तेव्हां आकाशांतूनच अट्टहास मोठ्यानें म्हणाला, "श्रीदर्शना! तुझ्या आईनें आपल्या घरीं अनेक रत्नजडित सोन्याचे अलंकार पुरून ठेवले आहेत. ते तूं घे व मालवदेशाला जा. त्या देशाच्या श्रीसेन राजानें द्यूतकारांना आश्रय देण्यासाठीं एक भव्य मठ बांधला आहे. त्या मठांत द्यूतकारांना मोफत रहायला मिळतें व सुग्रास जेवणहि दिलें जातें. तेथें जाऊन तूं राहिलास तर तुझें कल्याण होईल." आकाशांतून आलेले हे शब्द ऐकून दोघांनाहि आश्चर्य वाटलें. ती 'देववाणी असल्यानें खरी असणार' असा विचार करून ते दोघे पुनः आपल्या त्रिगर्ता नगरीला परत आले. त्यांनीं घरांतील

जमीन खणून पाहिली तों त्यांना अनेक रत्नजडित अलंकारांनीं भरलेला एक सुवर्णकलश दिसला. तो पाहून त्यांना अत्यंत हर्ष झाला. परमेश्वरी कृपेचें कौतुक करीत कांहीं धन बरोबर घेऊन ते मालवदेशाच्या प्रवासासाठीं निघाले. दिवसभर प्रवास करून ते अरण्यांत वसलेल्या बहुसर नांवाच्या एका गांवाजवळ येऊन ठेपले. त्या रात्रीं त्याच गांवांत मुक्काम करायचा असें त्यांनीं ठरविलें व सृष्टिसौंदर्य पहात ते तिकडे चालले असतां गांवाच्या वेशीवर असलेलें एक विस्तीर्ण सरोवर त्यांच्या दृष्टीस पडलें.

● ● ●

## विश्रांतींतून उद्भवलेलें कुतूहल

त्या सरोवराची शोभा पहात क्षणभर ते विसांव्यासाठीं तेथें बसले. सरोवराचें थंड व गोड पाणी प्याल्यानें त्यांच्या प्रवासाचा शीण नष्ट झाला. ते गप्पागोष्टी करीत तेथें बसले असतांना एक सुंदर स्त्री पाणी भरण्यासाठीं त्या सरोवराकडे आली. तिचें लक्ष त्या दोघांकडे गेलें. श्रीदर्शनाच्या सौंदर्यानें व तेजानें ती मुग्ध होऊन गेली. ते आहेत तरी कोण, याची चौकशी करावी म्हणून ती त्यांच्याजवळ आली व म्हणाली, " महाराज ! आपण या ठिकाणीं कशाला आलांत ? आपण जर या ठिकाणीं फार वेळ थांबाल तर अग्नींत झेंप घेणाऱ्या पतंगाप्रमाणें आपली अवस्था होईल. " तें ऐकून दोघेहि गोंधळांत पडले. तिच्या बोलण्याचा त्यांना कांहींच अर्थबोध होईना. तेव्हां सुखरक पुढें झाला व त्यानें तिला विचारलें, " बाई, येथें आल्यानें कोणती आपत्ति ओढवणार आहे ? ओढवणाऱ्या आपत्तीची जर आम्हांला कल्पना आली तर तिच्यांतून सुटका करून घेण्याचा आम्ही प्रयत्न करूं. शिवाय तूं कोण व या ठिकाणीं कां आलीस ? तूं आम्हांला या सर्व गोष्टी सविस्तर सांगितल्यास तर तुझे आमच्यावर फार उपकार होतील. "

● ● ●

## पद्मिष्ठेची कहाणी

मुखरकाचे हे शब्द ऐकून ती स्त्री म्हणाली, " महाभाग ! या अभागिनीची हकीगत ऐकून आपणांस काय उपयोग होणार आहे ? पण आपला आग्रह असेल तर सांगतें. — सुघोष: नांवाच्या गांवांतील एका ब्राह्मणाची पद्मिष्ठा नांवाची मी मुलगी. मुखरक नांवाचा माझा भाऊ द्यूताचें व्यसन जडून देशान्तराला गेला व तिकडेच राहिला. एकुलता एक मुलगा सोडून गेल्यानें आईला फार दुःख झालें व त्यांतच तिचा अंत झाला. त्या वेळीं मी बरीच लहान होतें. वडील त्याला शोधण्यासाठीं मला घेऊन गांवोगांव भटकूं लागले. बरींच वर्षें अशी भटकंती करूनहि व अनेक देश पालथे घालूनहि माझ्या भावाचा पत्ता लागला नाहीं. नंतर कांहीं वर्षें आम्ही मालवदेशांतच राहिलों. मी उपवर झालें असतां स्थळ पहाण्यासाठीं मला घेऊन बाबा प्रवासास निघाले. येथून जात असतां या अरण्यांतील चोरांनीं त्यांच्यावर हल्ला केला व त्यांना ठार करून मला बंदिवासांत टाकलें. नंतर मला त्या चोरांनीं आपला नायक वसुभूति याच्याकडे आणलें. त्याचीच या प्रदेशावर सत्ता आहे. मला सून करून घेण्याची त्याची इच्छा आहे. पण त्याचा मुलगा दरोडा घालण्यासाठीं परप्रांतांत गेला आहे. तो अजून आला नाहीं म्हणून मी बचावलें. येथल्या चोरांच्या दृष्टीला कोणीहि प्रवासी पडला कीं त्याला ठार करून त्याच्या जवळ असेलनसेल तें लुबाडायचें, अशी येथील पद्धत आहे. तुम्ही जर वसुभूति किंवा त्याचे अनुयायी यांच्या दृष्टीला पडलांत, तर तुमची कांहीं धडगत नाहीं. तेव्हां तुम्हांला कोणी पहाण्यापूर्वींच तुम्ही येथून पळून जा व आपले जीव वांचवा. माझ्या नशिबीं काय असेल त्याला तोंड द्यायची मीं तयारी ठेविली आहे."

तिची ही हकीगत ऐकत असतां मुखरकाच्या अंतःकरणांत कालवाकालव होत होती. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. आपल्या

बेताल वर्तनानें आपण सर्व कुटुंबाची धूळदाण केली व आपण मात्र घर करून सुखांत राहिलों याची त्याला शरम वाटूं लागली. त्याला भडभडून आलें व तो मोठ्यानें हुंदके देत शोक करूं लागला. "मीच तो तुझा दुर्दैवी दुष्ट भाऊ ! तूं मला क्षमा कर" असें म्हणून तो पद्मिष्ठेच्या पायां पडूं लागला. पद्मिष्ठा क्षणभर गोंधळून गेली. तिला भावाची ओळख पटली तेव्हां आईवडिलांची आठवण होऊन तिलाहि रडें कोसळलें. हें सर्व पहात असतां श्रीदर्शनाची स्थिति वेड्यासारखी झाली होती. शेवटीं पुढें होऊन त्यानें दोघांनाहि धीर दिला. तो म्हणाला, "मुखरका ! तुम्ही दोघें अशा रीतीनें शोक करत बसलां, तर सर्वांच्याच प्राणावर बेतेल. दुःख बाजूला ठेवा व प्रथम आपल्या सुटकेचा विचार करा." शोकाचा उमाळा ओसरल्यावर तिघांनीं एकत्र विचार केला व एक बेत रचला.

● ● ●

## मुक्ततेसाठीं बतावणी

त्याप्रमाणें श्रीदर्शनानें अत्यवस्थ झाल्याचें सोंग घेतलें. तें त्याला छानच जमलें. कारण पूर्वी घडलेल्या उपवासामुळें त्याच्या हाडांचा नुसता सांगाडा उरला होता. मुखरक त्याची सेवाशुश्रूषा करण्यांत गढून गेला. पद्मिष्ठेनें परत वाड्यांत जाऊन एक अत्यवस्थ प्रवासी सरोवराच्या तीरावर आला असून त्याचा मित्र घाबरून गेला आहे, असा निरोप वसुभूतीला दिला. वसुभूतीनें ताबडतोब आपला सेवक तिकडे पाठविला. सेवक येत आहे असें पाहून मुखरक गळा काढून रडूं लागला व श्रीदर्शन निश्चेष्ट पडून राहिला. वसुभूतीच्या सेवकानें मुखरकाला रडण्याचें कारण विचारलें. तेव्हां तो हुंदके देत देत म्हणाला, "बाबा रे ! मी व हा माझा भाऊ तीर्थयात्रेला चाललों आहोंत. आजारी असतांनाहि माझ्या भावानें प्रवासाचा हट्ट धरलाच. आज तर चार पावलेंहि चालणें अशक्य होऊन तो येथें निश्चेष्ट होऊन पडला आहे. 'काय होतें ?' म्हणून मीं विचारलें

दिवसभर त्यांचा प्रवास चालूच होता. संध्याकाळच्या सुमारास त्यांना निबिड अरण्यांतून मार्ग आक्रमण करावा लागत होता. सूर्यास्तानंतर ते एका झाडाच्या बुंध्याशीं विश्रांतीसाठीं बसले. थोड्या वेळानें वाघसिंहादि श्वापदांच्या गर्जनांनीं तो भाग दुमदुमून गेला. त्या गर्जना ऐकून त्यांच्या अंगावर भीतीचे रोमांच उभे राहिले. त्यांतून चोरांची धाड केव्हां पडेल याची धास्ती होतीच. दुपारीं पुरेसें खायला न मिळाल्यानें पोटांत कावळे ओरडत होते. तहानेनें घशाला कोरड पडली होती. जीव मुठींत घेऊन ते तेथें विचार करीत बसले असतां दूरवर धगधगत्या अग्नीच्या ज्वाळे-सारखें कांहींतरी त्यांच्या दृष्टीस पडलें. तिकडे निरखून पहात श्रीदर्शन मुखरकाला म्हणाला, "मित्रा ! त्या बाजूला बराच प्रकाश दिसत आहे. तेथें कुणाची तरी वसति असली पाहिजे. मी तेथें जातों व लोकवस्ति असल्यास कांहीं खायलाप्यायला मिळतें का तें पहातों. तुम्ही दोघें इथेंच थांबा. मी लवकरच येतों." असें म्हणून मुखरकाचें म्हणणें ऐकून न घेतांच श्रीदर्शन तिकडे निघालासुद्धां. तो त्या प्रकाशाच्या रोखानें चालला व जवळ जाऊन पहातो तों त्या ठिकाणीं त्याला एक रत्नजडित वाडा दिसला. त्यावर तळपणाऱ्या रत्नांचें तें तेज होतें.

● ● ●

### श्रीदर्शनाचें साहस

हळूंच वाड्यांत शिरून तो एका भव्य अशा महालांत आला. त्या ठिकाणीं एका उंच मंचकावर एक यक्षीण बसली असून तिच्याभोंवतीं अनेक दासींचा घोळका त्याला दिसला. भुकेनें त्याचे डोळे पांढरे व्हायची वेळ आली होती. त्यामुळें रीतिरिवाज गुंडाळून ठेवून तो थेट यक्षिणीकडे गेला व तिच्याकडे त्यानें अन्नपाण्याची याचना केली. त्याच्या चेहऱ्यावर भीति किंवा शंका यांचा लवलेशहि तिला दिसला नाहीं. त्याची धिटाई पाहून यक्षीण प्रसन्न झाली व त्याला हवें तितकें अन्न व पाणी देण्याची

व्यवस्था तिनें केली. तें नेण्यासाठीं तिनें आपल्या एका सेविकेलाहि त्याच्याबरोबर पाठविलें. वडाच्या झाडाजवळ आल्यानंतर त्यानें त्या सेविकेला जायला सांगितलें व नंतर त्या तिघांनीं चंद्राच्या अंधुक प्रकाशांतच त्या दिव्य अन्नाचा मनसोक्त आस्वाद घेतला. श्रीदर्शनाच्या धैर्याबद्दल मुखरकाला आश्चर्य वाटलें. पद्मिष्ठेचाहि आदर द्विगुणित झाला.

● ● ●

## पद्मिष्ठेच्या स्वीकाराचें आश्वासन

जेवणानंतर गप्पागोष्टी चालू असतां मुखरक श्रीदर्शनाला म्हणाला, " मित्रा ! माझी तुला एक नम्र विनंति आहे. दोन दिवस झाले, पद्मिष्ठेचा व तुझा परिचय झाला आहे. प्रवासांत तिच्या गुणांची तुला कल्पना आलीच आहे. तिच्या भावना लक्षांत घेऊन तूं तिचा पत्नी म्हणून स्वीकार करावास " श्रीदर्शन उत्तर देईपर्यंत पद्मिष्ठेचा जीव खालींवर होत होता. श्रीदर्शन म्हणाला, " मित्रा ! तुझी विनंति मीं कधीं अमान्य केली आहे काय ? पण योग्य वेळ पाहून व मला जीवनांत स्थैर्य लाभल्यावर मी तुझ्या बहिणीचाच स्वीकार करीन. " त्याचे हे शब्द ऐकून पद्मिष्ठेचा जीव भांड्यांत पडला. मुखरकाचीहि फार मोठी काळजी दूर झाली. नंतर इकडच्या तिकडच्या गप्पांत तिघांनीं ती रात्र आनंदांत घालविली.

● ● ●

## वृद्ध स्त्रीकडून आदरातिथ्य

सकाळीं उठून ते पुढच्या प्रवासास निघाले. लवकरच ते श्रीसेन राजाच्या मालवदेशांत येऊन पोहोंचले. थोड्याच दिवसांत ते राजधानींत आले. वाटचालीच्या श्रमामुळें ते थकून गेले होते. रात्रीची वेळ असल्यामुळें द्यूतशाळेच्या शोधांत न रहातां वेशीवरील एका घरांत मुक्काम करावयाचा असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं एका घरांत चौकशी करतां एका

ब्राह्मण स्त्रीनें त्यांचें आदरातिथ्य केलें. त्यांनीं आपलें नांव गांव वगैरे सांगून तिच्या आदरातिथ्याबद्दल तिचे आभार मानले. त्या सर्व संभाषणांत त्या वृद्ध स्त्रीचा चेहरा सतत चिंताग्रस्त होता. श्रीदर्शनानें तिला चिंतेचें कारण विचारलें तेव्हां ती म्हणाली, " बाबारे ! माझे पति निपुत्रिक वारले. त्यामुळें त्यांची सर्व मिळकत सरकारजमा झाली. तरी दयाळू राजानें त्यांतील चवथा हिस्सा माझ्यासाठीं राखून ठेवला आहे. पण दुर्दैव माझें ! तो राजा क्षयरोगानें आजारी पडला. अनेक वैद्यांचे उपचार झाले पण कोणाच्याहि हाताला गुण आला नाहीं. एका मांत्रिकानें मात्र त्याला आश्वासन दिलें. तो म्हणाला, " महाराज ! जर कोणी धाडसी वीर मला मदत करायला तयार असेल, तर वेताळाला वश करून घेऊन मी आपला रोग नाहींसा करतों." मांत्रिकानें निश्चयपूर्वक असें सांगितलें असतां, राजानें सर्व राज्यांत दवंडी पिटविली पण कोणीहि वीर पुढें आला नाहीं. राजा दिवंगत झाला तर माझ्या उपजीविकेचें साधन नष्ट होणार म्हणून मला काळजी लागून राहिली आहे. म्हातारीचे ते शब्द ऐकून श्रीदर्शन म्हणाला, " आजी ! मी या गोष्टीला तयार आहें. तुम्हीं मला राजाकडे घेऊन चला." त्याची तयारी पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. 'त्यानें जाऊं नये' असें पद्मिनीला मनापासून वाटत होतें. पण धाडसाच्या कामांत मोडता घालायचा नाहीं असें तिनें ठरविलें. म्हातारीनें त्या सर्वांना रात्रीं विश्रांति घेण्यास सांगितलें व दुसरे दिवशीं सकाळीं राजाकडे जायचें ठरलें.

• • •

## राजाच्या मांत्रिकाला मदतीचें आश्वासन

ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं म्हातारी श्रीदर्शनाला घेऊन राजवाड्यांत आली. महालांत आल्यावर श्रीदर्शनानें राजाला वंदन केलें व आपल्या येण्याचा हेतु सांगितला. तो ऐकून राजाला अत्यंत आनंद झाला. ताबडतोब त्यानें मांत्रिकाला बोलावून घेतलें व तो त्या मांत्रिकाला

म्हणाला, "बाबारे! तुला हवा होता तसा धाडसी वीर, हा पहा आला आहे. याची मदत तुला होईल. तूं आपल्या पुढच्या तयारीला लाग." हें ऐकून मांत्रिकानें श्रीदर्शनाकडे न्याहाळून पाहिलें व तो त्याला म्हणाला, "मित्रा! आजच कृष्णचतुर्दशी असल्यामुळें आजचा दिवस होमाला अगदीं योग्य आहे. तेव्हां आज मध्यरात्रीं तूं स्मशानांतील चंडिकेच्या देवळांत ये. तेथें तुला एका वेताळाला बोलावून आणण्याचें काम करावें लागेल." श्रीदर्शनानें यावयाचें कबूल केल्यावर पुढच्या तयारी-साठीं मांत्रिक निघून गेला व राजाचा निरोप घेऊन श्रीदर्शनहि म्हातारी-बरोबर घरीं परतला. त्या दिवशीं सर्वांनीं पूर्ण विश्रांति घेतली. श्रीदर्शन रात्रीं केवळ कृपाण हातांत घेऊन स्मशानाकडे एकटाच निघाला.

● ● ●

## वेताळाशीं गांठ

कोणालाहि भीति वाटेल असें तें दृश्य होतें. सर्वत्र घनदाट अंधार पसरलेला होता. अधूनमधून पेटलेल्या चितांच्या ज्वाला त्या अंधारांतून डोकावत होत्या. कोल्हे ओरडत होते. भुतें नाचत होतीं. अशा त्या स्मशानांतून वाट काढत श्रीदर्शन चंडिकेच्या मंदिरांत आला. मांत्रिक पूर्वींच आला होता. तेव्हां तो श्रीदर्शनाला म्हणाला, "येथून पश्चिमेकडे अर्धा कोस चालून जा. तेथें चितेच्या अग्नीनें पालवी जळून गेलेलें एक शिसवीचें झाड आहे. त्याच्या खालीं असलेल्या प्रेताला कसलीहि इजा न करतां येथें घेऊन ये." "ठीक आहे" असें म्हणून श्रीदर्शन घाई-घाईनें त्या वृक्षाजवळ आला. त्याच वेळीं दुसरा कोणीतरी तें प्रेत घेऊन जात आहे असें त्याला दिसलें. धांवतच तो पुढें गेला व दुसऱ्या व्यक्तीच्या खांद्यावर असलेलें प्रेत ओढीत, त्याला म्हणाला, "अरे! या माझ्या मित्राला तूं कुठें पळवून नेत आहेस? मी याला अग्निसंस्कार देणार आहें. तेव्हां सोड हें प्रेत." श्रीदर्शनाचें हें भाषण ऐकून प्रेत

घेऊन निघालेली ती दुसरी व्यक्ति म्हणाली, " अरे थापाड्या ! खोटें बोलूं नकोस. हा माझा मित्र आहे म्हणून याला मी घेऊन चाललों आहें. सोड याचा पाय." असें म्हणून तो त्या प्रेताला ओढूं लागला. अशा रीतीनें दोघेहि त्या प्रेताची ओढाताण करीत असतां एका अदृश्य वेताळा-नेंच त्या प्रेतांत प्रवेश केला व मोठ्यानें गर्जना केली. त्या क्षणीं श्रीदर्शनाच्या प्रतिस्पर्ध्याची भीतीनें गाळण उडाली व हृदयक्रिया बंद पडून तो तेथल्या तेथें मरून पडला.

• • •

## वचनपूर्तीसाठीं शरिराचे लचके तोडले

श्रीदर्शनाला आतां कोणतीहि आडकाठी नव्हती. वेताळानें संचार केलेलें तें प्रेत खांद्यावर टाकून तो मंदिराकडे निघाला तोंच त्याच्या प्रतिस्पर्ध्याच्या प्रेतांत दुसऱ्या एका वेताळानें संचार केला व श्रीदर्शनाला अडवून तो वेताळ म्हणाला, " तूं नेतोस तो माझा मित्र आहे." तेव्हां श्रीदर्शन म्हणाला, " नाहीं, तो माझा मित्र आहे व मी त्याला नेणार!" पुन्हां भांडण सुरूं झालें. शेवटीं श्रीदर्शनाच्या खांद्यावरील वेताळानें झपाटलेल्या प्रेतालाच विचारायचें असें ठरलें. त्याला विचारलें असतां वेताळाचा संचार झालेलें तें प्रेत म्हणालें, " मी भुकेनें व्याकूळ झालों आहें. मला जो खाद्य पुरवील त्याचा मी मित्र आहें." तें ऐकून याला खाद्य कोठून पुरवावें हा प्रश्न दुसऱ्या वेताळाला पडला. पण श्रीदर्शनानें मात्र खांद्यावरील वेताळाला खाद्य देण्यासाठीं समोर असलेल्या वेताळावरच खड्गानें प्रहार करायला सुरुवात केली. तेव्हां तो वेताळ अदृश्य झाला. तें पाहून श्रीदर्शन खांद्या-वरील वेताळाला घेऊन चालला. पण तो वेताळ म्हणाला, " मला खाद्य देऊन, तूं माझा मित्र आहेस हें सिद्ध केलेंस, तरच तूं नेशील तिकडे मी येईन. नाहींतर तुलाहि मी सोडणार नाहीं." त्याचे हे शब्द ऐकून श्रीदर्शनाला

प्रश्न पडला. खाद्य कोठून मिळवावें हें त्याला कळेना. शेवटीं त्याला एक युक्ति सुचली. त्यानें आपल्या तीक्ष्ण खड्गानें स्वतःच्या शरिराचे लचके तोडले व ते त्या वेताळाला खाऊं घातले. त्याचें तें धैर्य पाहून तो वेताळ प्रसन्न झाला व म्हणाला, " मित्रा ! तुझें धैर्य अलौकिक आहे. माझ्या कृपेनें तुझा देह पूर्वीसारखा होईल. आपल्या धैर्यानें तूं मला जिंकलें आहेस. तूं सांगशील तिकडे यायला मी आतां तयार आहें." असें वेताळानें म्हणतांच श्रीदर्शनाच्या सर्व जखमा भरून आल्या. एका क्षणांत जखमांच्या खुणाहि दिसेनाशा झाल्या. शेवटीं श्रीदर्शन वेताळाला घेऊन मांत्रिकाकडे आला.

● ● ●

## धैर्यानें वेताळाला वश केलें

श्रीदर्शन येईपर्यंत मांत्रिकानें सारी तयारी करून ठेवली होती. वेताळ तेथें येतांच त्यानें अक्राळविक्राळ रूप धारण केलें. तें पाहून मांत्रिक घाबरला व पळून जाऊं लागला. तेव्हां त्या वेताळानें मांत्रिकाला जसाच्या तसा गिळून टाकलें. खड्ग उगारून श्रीदर्शन मात्र त्याच्यावर धांवून गेला. त्याचें तें धैर्य पाहून त्याला वश झालेला वेताळ अधिकच संतुष्ट झाला व त्याला म्हणाला, " मित्रा ! आपल्या पराक्रमानें तूं मला पूर्वींच जिंकलें आहेस. आतां या होमामुळें माझ्या तोंडांत निर्माण झालेल्या या मोहऱ्या तूं घे व त्या राजाच्या डोक्यावर आणि हातावर बांध म्हणजे तो रोगमुक्त होईल. शिवाय तुलाहि या कृत्याबद्दल योग्य तें बाक्षिस मिळेल. " वेताळाचे हे शब्द ऐकून ' राजाचें कार्य झालें ' या विचारानें श्रीदर्शनाला अत्यंत आनंद झाला. पण एकट्यानेंच राजाकडे कसें जायचें या विचारानें तो वेताळाला म्हणाला, " मित्रा ! तूं माझ्यावर मोठा अनुग्रह केला आहेस. तुझे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं. पण मांत्रिक बरोबर नसतांना मी एकटाच राजाकडे गेलों तर स्वार्थासाठीं मींच त्याला मारलें अशी राजाला शंका येईल. तेव्हां त्या मांत्रिकालाहि परत जिवंत कर व माझ्या-

बरोबर पार्थिव." श्रीदर्शनाची भीति दूर करण्याच्या दृष्टीनें वेताळ म्हणाला, "मित्रा ! मी या प्रेताचा त्याग केला असतां, हा मेलेला मांत्रिक या प्रेताच्या पोटांतच राहील. राजाला शंका आलीच तर हें शव फाडून तूं त्याची खात्री पटवून दे." असें म्हणून श्रीदर्शनाच्या हातीं मोहऱ्या देऊन त्यानें त्या प्रेताचा त्याग केला. तेव्हां तें प्रचंड धूड धाडकन् जमिनीवर कोसळलें व श्रीदर्शन यशस्वी होऊन घरीं परतला.

● ● ●

## श्रीदर्शनाला युवराजपद

सकाळीं राजवाड्यांत येऊन श्रीदर्शनानें रात्रीं घडलेली सर्व हकीगत राजाला सांगितली व कोणाच्याहि संशयाला जागा राहूं नये म्हणून मुख्य मंत्र्याला नेऊन तें प्रेत दाखविलें. त्यानें सेवकांकरवीं तें फाडलें असतां त्यांतून मेलेला मांत्रिक बाहेर पडला. तें पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. आपण निर्दोषी असल्याचें सिद्ध झालेलें पाहून श्रीदर्शनाला मोठें समाधान झालें. वेताळानें सांगितल्याप्रमाणें त्यानें त्या मोहऱ्या राजाच्या डोक्यावर व हातावर बांधल्या व त्यामुळें राजा लवकरच रोगांतून मुक्त झाला. राजाला मूलबाळ कोणीच नव्हतें. त्यानें श्रीदर्शनालाच आपला पुत्र मानलें व मोठ्या समारंभपूर्वक युवराजपदावर त्याला अभिषेक करून त्याच्या उपकाराची फेड केली. श्रीदर्शनानें लवकरच पद्मिष्ठेशीं विवाह केला. मुखरकाला आपला मंत्री बनवून श्रीसेन राजाच्या मार्गदर्शनाखालीं तो मालवदेशाचें राज्य करूं लागला.

● ● ●

## गणपतीची स्थापना व योजना

एकदां उपेंद्रशक्ति या नांवाचा एक मोठा व्यापारी अनेक द्वीपांचा प्रवास करून राजधानीस परत आला होता. प्रवासांत समुद्राच्या किनाऱ्यावर रत्नजडित गणपतीची एक मूर्ति त्याला मिळाली होती.

उपेन्द्रशक्तीनें ती युवराज श्रीदर्शनास भेट दिली. श्रीदर्शनानें एक मोठें भव्य मंदिर बांधवून त्यांत त्या मूर्तीची स्थापना केली.

श्रीदर्शन स्वतः नियमान गणपतीची उपासना करीत असे. त्याच्या उपासनेनें संतुष्ट झालेल्या गणपतीनें आपल्या गणांना बोलावून आणलें व तो त्यांना म्हणाला, " माझी उपासना करणारा श्रीदर्शन लवकरच सम्राट होणार आहे. हंसद्वीप बेटावरील अनंगोदय राजाची कन्या अनंगमंजिरीहि नेहमीं माझी उपासना करते व ' सम्राट राजा आपला पति व्हावा ' अशी नेहमीं प्रार्थना करीत असते. श्रीदर्शनाचा तिच्याशीं विवाह झाला तर तिची इच्छा पूर्ण होईल व श्रीदत्ताच्या नशिबीं असलेली दुसरी अनुरूप पत्नी त्याला मिळेल. त्यांचा विवाह घडून यावा अशी योजना मीं आंखली आहे. या घटनेंतून माझी प्रतिमा आणून देणाऱ्या उपेंद्रशक्तीवरहि उपकार होणार आहेत. तेव्हां आज रात्रीं तुम्हीं श्रीदर्शनाला हंसद्वीपावर घेऊन जा व सूर्योदयापूर्वीं त्याला परत आणा. " गणपतीची आज्ञा त्याच्या गणांनीं शिरसामान्य केली व ते आपआपल्या कामाला निघून गेले.

• • •

## अनंगमंजिरीच्या महालांत श्रीदर्शन

रात्रीं सर्वजण गाढ झोंपले असतां गणांनीं अदृश्य रूपानें श्रीदर्शनाच्या महालांत प्रवेश केला व त्याचा पलंग अलगद उचलून त्याला घेऊन आकाशांतून क्षणांत ते हंसद्वीपावर आले. अनंगमंजिरी आपल्या महालांत गाढ झोंपली होती. गणांनीं श्रीदर्शनाचा पलंग तिच्या महालांत एका बाजूला नेऊन ठेवला व ते गण अदृश्य रूपानें तेथेंच उभे राहिले. श्रीदर्शनाला अचानक जाग आली तेव्हां रत्नाचे दिवे तेवत असलेल्या व हिऱ्यामाणकांनीं जडविलेल्या एका महालांत आपण आहोंत असें त्याला दिसून आलें. त्यानें सगळीकडे नजर टाकली तेव्हां एका चौथऱ्यावर रत्नजडित मंचकावर एक सुंदर कन्या झोंपलेली

त्याला दिसली. 'कोण बरें ही देवता असेल' असा विचार त्याच्या मनांत आला. आपण आहोंत तरी कोठें तें पहावें म्हणून तो उठला. त्याच वेळीं अनंगमंजिरीलाहि, एका दिव्याकृति पुरुषाशीं गणपति आपली ओळख करून देत आहे, असें स्वप्न पडलें व तिला अचानक जाग आली. तिच्यापुढें प्रत्यक्ष श्रीदर्शन असूनहि आपण अजूनहि स्वप्नांतच आहोंत असा भास तिला झाला! तें स्वप्न आहे का वस्तुस्थिति आहे, हें पहाण्यासाठीं ती आपल्या मंचकावरून उठली. तेव्हां श्रीदर्शनहि तिच्याजवळ आला व त्यानें तिला विचारलें, "देवी तूं कोण आहेस? तूं मला या ठिकाणीं कां आणलें आहेस?" अनंगमंजिरीनें पुनः एकदां सगळीकडे दृष्टि टाकली. सर्वत्र पहारा असतांनाहि हा दिव्य पुरुष ज्या अर्थी येथें दिसतो, त्या अर्थी हा कोणी तरी देव असला पाहिजे, अशी तिची कल्पना झाली. पण 'तूं मला या ठिकाणीं कां आणलें आहेस?' या त्याच्या प्रश्नाचा मात्र तिला बोध होईना. कारण तिनें मुळीं त्याला आणलेंच नव्हतें. तिनें आपली हकीगत त्याला अगदीं थोडक्यांत सांगितली व "आपण कोण? येथें कसें आला?" असा प्रश्न त्याला विचारला. त्यानेंहि आपली माहिती थोडक्यांत सांगितली. पण तो तेथें कसा आला हें त्याचें त्यालाहि माहीत नव्हतें. त्यामुळें दोघांनाहि त्याचें आश्चर्य वाटलें. अनंगमंजिरीच्या सौजन्यानें व शालीनतेनें तो भारावून गेला व श्रीदर्शनाच्या सौम्य व सौजन्यपूर्ण वर्तनानें तिला मोहून टाकलें होतें. 'गणपतीनेंच आपली याच्याशीं ओळख करून दिली, तेव्हां हाच आपला भावी पति' असा विचार तिच्या मनांत आला. दोघांनींहि आपापलीं अंतःकरणें एकमेकांसमोर उघड केलीं व परस्पर-प्रेमाची खूण म्हणून एकमेकांच्या बोटांतील आंगठ्या व अंगावरील दागिने परस्परांना दिले. गांधर्वविधीनें विवाह करावा असा विचार दोघांच्याहि मनांत आला. त्याच वेळीं गणांनीं त्यांना मोहून

टाकलें. दोघेंहि पुन्हां झोंपीं गेलीं असतां गणांनीं पूर्वीप्रमाणेंच श्रीदर्शनाचा पलंग आकाशमार्गानें त्याच्या महालांत आणून ठेवला.

• • •

## स्वप्न नव्हे, वस्तुस्थिति

श्रीदर्शन सकाळीं जेव्हां जागा झाला तेव्हां रात्रीं आपण एक सुंदर स्वप्न पाहिलें असें त्याला वाटलें. सहज त्याचें लक्ष आपल्या बोटांकडे गेलें, तेव्हां आपल्या नेहमींच्या आंगठीऐवजीं एक नाजूक आंगठी आपल्या बोटांत आहे असें त्याला दिसलें. अंगावरील कांहीं अलंकारहि स्त्रियांच्या अलंकारांपैकीं असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. त्यामुळें तो गोंधळून गेला. रात्रींच्या सर्व घटना त्याच्या डोळ्यापुढें येऊं लागल्या. त्याचें लक्ष कशांतच लागेना. तो भ्रमिष्टासारखा वागूं लागला. पद्मिष्ठेला काय करावें तें सुचेना. तिनें सर्व हकीगत श्रीसेनाच्या कानावर घातली. श्रीदर्शनानें राजाला सर्व घटना सांगितल्या व 'अनंगमंजिरी'चें नांव कोरलेली ती आंगठी व इतर दागिनेहि त्याला दाखविले. श्रीसेनानें सर्व गोष्टी लक्षपूर्वक ऐकल्या व 'हंसद्वीपाला जाऊन आलेला कोणी मनुष्य आपल्या राज्यांत आहे काय' याबद्दल दवंडी पिटवून चौकशी केली. पण तसा कोणी माणूस सांपडला नाहीं.

• • •

## योगी ब्रह्मसोमाचें अनंगोदयास आश्वासन

इकडे अनंगमंजिरीची तीच अवस्था झाली होती. श्रीदर्शनाच्या नांवानें चिन्हित असलेली ती आंगठी व इतर भूषणें आपल्या वडिलांना दाखवून तिनें घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली. अनंगोदय राजाला त्यांतून कांहींच अर्थबोध होईना. मानवाला अगम्य असें कांहींतरी माया-जाल असावें असें वाटून ब्रह्मसोम नांवाच्या एका अन्तर्ज्ञानी योग्याची त्यानें भेट घेतली. ब्रह्मसोमानें अन्तर्ज्ञानानेंच राजाच्या येण्याचें कारण

जाणलें व तो अनंगोदयाला म्हणाला, " राजा ! तूं कां आला आहेस हें मी समजलों. गणपतीच्या इच्छेवरून मालवदेशाच्या युवराजाला त्याच्या गणांनीं अनंगमंजिरीच्या महालांत आणलें व दोघांची ओळख झाल्यावर त्यांना मोह पाडून, युवराज श्रीदर्शनाला पुनः त्याच्या वाड्यांत नेलें. श्रीदर्शन लवकरच सम्राट होणार आहे व त्याच्याशीं लग्न झालें असतां ' आपला पति सम्राट असावा ' ही तुझ्या मुलीची इच्छा पूर्ण होणार आहे." ब्रह्मसोमाच्या तोंडून ही माहिती ऐकून अनंगोदयाला अत्यंत आनंद झाला. पण अनंगमंजिरीची अवस्था लक्षांत येऊन तो फार दुःखी बनला. तेव्हां ब्रह्मसोमाला त्याची दया आली. राजाला धीर देत तो म्हणाला, " राजा ! तूं कसलीहि काळजी करूं नको. मला करतां येतील तितके प्रयत्न मी करतों. " असें म्हणून ब्रह्मसोम जागच्या जागींच अदृश्य झाला व क्षणांत मालवदेशाच्या राजधानींत येऊन पोहोंचला. तेथें तो श्रीदर्शनानें स्थापना केलेल्या गणपतीच्या मंदिरांत येऊन त्याला वंदन करून तेथें उभा राहिला.

• • •

### महेन्द्रशक्तीचें वेड नाहीसें होतें

इतक्यांत एक वेडा अद्वातद्वा बडबडत मंदिरांत शिरला. त्यानें आपल्या शरिरावरील वस्त्रांच्या चिंध्या चिंध्या करून, त्यांचें गाठोड काखोटीस मारलें होतें व तो उघडा-नागडाच भटकत होता. डोळे तारवटलेले, केंस पिंजारलेले अशा स्थितींत तो गणपतीसमोर आला व तेथें प्रार्थना करीत असलेल्या योग्याच्या अंगावर धावून गेला. योगी ब्रह्मसोमानें एकदां त्याच्याकडे निरखून पाहिलें व मंत्र म्हणत त्याच्या कानशिलांत लगावली. त्या वेळीं त्या वेड्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकूं लागले. त्याची धुंदी उतरली. त्याचें स्वतःकडे लक्ष गेलें व आपली स्थिति पाहून तो शरमिंधा होऊन गेला. ब्रह्मसोमाचे पाय धरून त्यानें त्याची

क्षमा मागितली. त्यानें सौम्य दृष्टीनें पाहिल्यावर तो वेडा चिंध्या गुंडाळून कसेंबसें लज्जारक्षण करीत तोंड लपवीत आपल्या घरीं आला. तो वेडा म्हणजे गजाननाची मूर्ति श्रीदर्शनाला भेट देणाऱ्या उपेंद्रशक्ति व्यापाऱ्याचा एकुलता एक मुलगा महेंद्रशक्ति होता. त्याला बरेच दिवसांपासून वेड लागलेलें होतें. त्यामुळें आपला मुलगा ताळ्यावर आलेला पाहून उपेंद्रशक्तीला हर्ष झाला. महेंद्रशक्तीला चांगले कपडे घालून तो उपकारकर्त्या योग्याच्या दर्शनाला आला. उपेंद्रशक्तीनें आपल्याबरोबर आणलेला मोठा नजराणा ब्रह्मसोमाच्या चरणांवर अर्पण केला. पण त्याला स्पर्शहि न करतां तो परत नेण्यास त्यानें उपेंद्रशक्तीला सांगितलें. ब्रह्मसोमाची निस्पृहता व दैवी सामर्थ्य यांचें कौतुक करीत लोक निघून गेले. ती बातमी वाऱ्यासारखी सर्व शहरांत पसरली. ती ऐकून स्वतः श्रीसेन राजा श्रीदर्शनाला बरोबर घेऊन ब्रह्मसोमाच्या दर्शनासाठीं मंदिरांत आला.

• • •

### योगी 'चोरा'सह अदृश्य होतो

श्रीसेनाच्या येण्याचा हेतु अंतर्ज्ञानानें जाणून तो कांहीं बोलण्यापूर्वीच ब्रह्मसोम हंसत हंसत म्हणाला, "राजा! तुझा हा मुलगा चोर आहे! एके दिवशीं रात्रीं हंसद्वीपाला जाऊन राजकन्या अनंगमंजिरीचे दागिने व हृदय यानें चोरून आणलीं आहेत. तेव्हां याला काय शिक्षा करावी तूंच सांग." ब्रह्मसोम योग्याचें तें चेष्टेचें भाषण ऐकून राजा बुचकळ्यांत पडला व विनवणीच्या स्वरांत त्याला म्हणाला, "महाराज! आपण सर्वच गोष्टी जाणतां आहांत. तेव्हां या बाबतींत आपणांस योग्य वाटेल तेंच करा." राजाचे हे अगतिकपणाचे शब्द ऐकून त्याला धीर देत ब्रह्मसोम म्हणाला, "राजा, तूं निश्चिंत रहा. लवकरच अनंगमंजिरी तुझी सून म्हणून येथें येईल. मात्र त्यासाठीं या चोराला माझ्या हातीं दे." असें म्हणून त्यानें श्रीदर्शनाचें मनगट पकडलें व त्याच्यासह तो क्षणांत

अदृश्य झाला. त्याच्या योगसामर्थ्यावर राजाचा विश्वास बसल्यामुळें त्याला श्रीदर्शनाबद्दल कसलीच काळजी वाटत नव्हती. पद्मिष्ठेची मात्र समजूत घालतांना त्याला कष्ट पडले.

• • •

## श्रीदर्शनाचें अनंगमंजिरीसह राजधानीस आगमन

इकडे ब्रह्मसोम श्रीदर्शनाला घेऊन अनंगोदयाच्या महालांत आला. अनंगोदयानें दोघांचेंहि स्वागत केलें व योग्याच्या चरणांना वंदन करून कृतज्ञतापूर्वक त्याचे आभार मानले. श्रीदर्शनाचें सौंदर्य व तेज पाहून आपल्या मुलीची निवड योग्य असल्याची अनंगोदयाची खात्री पटली. अनंगोदयानें श्रीदर्शनाला कांहीं दिवस आपल्याकडेच ठेऊन घेतलें व लव-करच एका शुभ मुहूर्तावर आपली लाडकी लेक त्यानें श्रीदर्शनाच्या हातीं सोंपविली. नंतर ब्रह्मसोमाच्या योगसामर्थ्यानें श्रीदर्शन अनंगमंजिरीसह मालवदेशाला येऊन पोहोंचला. नववधूसह आपला युवराज परत आलेला पाहून राजाला फारच समाधान झालें. त्याच्या आगमनानंतर राजानें नगरींत मोठा उत्सव साजरा केला. अनंगमंजिरीमुळें आपला पति सम्राट होणार या जाणिवेनें पद्मिष्ठेलाहि आनंदच झाला. ती अनंगमंजिरीशीं बहिणीप्रमाणें प्रेमानें वागूं लागली.

श्रीदर्शनाचा संसार सुखांत चालला असतां श्रीसेनानें इहलोकींची यात्रा संपविली. राज्याचीं सूत्रें प्रत्यक्ष हातीं आल्यावर श्रीदर्शनानें दिग्वि-जय करून सर्व राजांना आपले मांडलिक बनविले व तो पृथ्वीवरील अद्वितीय सम्राट बनला.

• • •

## पुत्रजन्माचा साहाळा

कांहीं काल लोटल्यावर पद्मिष्ठा व अनंगमंजिरी यांना मुलगे झाले. श्रीदर्शनानें पुत्रजन्माचा सोहाळा आपल्या वैभवाला साजेसा केला.

थोड्याच दिवसांत मोठ्या थाटानें मुलांचें बारसें केलें. पद्मिनीच्या मुलाचें नांव पद्मसेन व अनंगमंजिरीच्या मुलाचें नांव अनंगसेन असें ठेवण्यांत आलें. आपल्या बाललीलांनीं दोन्ही मुलांनीं सर्वांना मोहून टाकलें. योग्य वेळीं श्रीदर्शनानें त्यांची मुंज केली व त्यांच्यासाठीं तयार केलेल्या खास विद्यालयांत त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. दोन्ही कुमार कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळें लवकरच ते अनेक विद्यांत पारंगत झाले.

• • •

## ब्राह्मणाचें आगमन व राण्यांचें देहावसान

एके दिवशीं श्रीदर्शन आपल्या दोन्ही राण्यांसह महालांत बसला असतां, एक ब्राह्मण महालाबाहेर मोठमोठ्यानें शोक करीत असलेला त्यांना दिसला. श्रीदर्शनानें त्याला आंत बोलावून घेतलें व "तुझ्या शोकाचें कारण काय ?" म्हणून चौकशी केली. तेव्हां तो ब्राह्मण म्हणाला, "महाराज माझ्या घरीं ज्योतिलेखा व धूमलेखा यांनीं युक्त असा जो दीप्तशिख अग्नि होता तो अट्टहास करणाऱ्या कालभैरवानें नष्ट करून टाकला." इतकें बोलून तो ब्राह्मण तेथेंच अंतर्धान पावला. त्याच्या या म्हणण्याचा कुणालाच अर्थ समजला नाहीं. शिवाय तो एकाएकीं अदृश्य झालेला पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. हें काय असावें म्हणून राजा प्रश्नार्थक मुद्रेनें पद्मिनी व अनंगमंजिरी यांच्याकडे पाहूं लागला तोंच त्यांच्या कुडींतून प्राण निघून गेले आहेत असें त्याला दिसलें. तो काय प्रकार आहे तें कोणालाच कळेना. शोकावेगानें राजाहि मूर्च्छित होऊन पडला. राजवाड्यांत सगळी-कडे आकांत सुरू झाला. सेवकांनीं धांवत जाऊन मुखरकाला ही बातमी दिली. तो धांवतच राजमहालांत आला. त्यानें प्रयत्नानें राजाला शुद्धीवर आणलें. राजपुत्र पद्मसेन व अनंगसेन हे तर शोकानें वेडे होण्याची वेळ आली. त्यांची ती अवस्था पाहून श्रीदर्शनानें आपला शोक आवरला. त्यांना धीर दिला व जड अंतःकरणानें दोन्ही राण्यांचा अंत्यविधि पार

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

# संस्कृत साहित्य सरिता

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

कालिदासाचें 'शाकुन्तल', शूद्रकाचें 'मृच्छकटिक' किंवा बाणाची 'कादम्बरी' हीं सामान्य मराठी वाचकाच्या दृष्टीनें केवळ ऐकलेलीं नांवें असतात; परंतु त्या नांवांच्या पुस्तकांत काय लिहिलेलें आहे हें थोडक्यांत, सोप्या भाषेंत, चटकन् समजलें तर किती बहार होईल !

✤ ✤ ✤

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचक-वर्ग यांसाठीं

✤ ✤ ✤

संस्कृत वाङ्मय मराठींतून गोष्टीरूपानें. प्रत्येक काव्य-नाटकाचें स्वतंत्र पुस्तक. ३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ६ आणे. पुठ्ठयाच्या मजबूत पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें; एकत्र संच : १२ रुपये

★

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित ( १ )
११. दशकुमारचरित ( २ )
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय-नैषध

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

IRBK-0106271

पाडला. थोड्याच दिवसांत श्रीदर्शनानें आपलें राज्य दोन्ही मुलांना वांटून दिलें व तपश्चर्येसाठीं तो वनांत निघून गेला.

● ● ●

## वडाच्या झाडांतील सोन्याचा वाडा

तो अरण्यांतून भटकत असतां एका वडाच्या झाडाजवळ आला. त्या वेळीं दोन सुंदर स्त्रिया फळें व कंदमुळें घेऊन त्याच्याजवळ आल्या व म्हणाल्या, " महाराज ! आपणासाठीं आम्हीं हीं दिव्य फळें व कंदमुळें आणलीं आहेत. आपण यांचा स्वीकार करावा." त्यांची ती विनंति मान्य करण्यापूर्वी राजानें त्यांना विचारलें, " बायांनो ! तुम्हीं कोण व या निबिड अरण्यांत कशासाठीं आलांत ? हीं फळें तुम्हीं मला कां देत आहांत ? " राजाची जिज्ञासा वाढलेली आहे हें पाहून त्यांच्यापैकीं एक स्त्री म्हणाली, " महाराज ! जवळच आमचें घर आहे. तिकडे आपण चला म्हणजे आमची सर्व हकीगत आपणांस कळेल " त्या आहेत तरी कोण हें जाणून घेण्याच्या इच्छेनें राजा त्यांच्यामागोमाग निघाला. वृक्षाच्या ढोलींत प्रवेश केल्यावर चार-पांच पायऱ्या उतरून तो आंत आला तोंच एक सोन्याचा मोठा वाडा त्याला दिसला.

● ● ●

## श्रीदर्शनाला पूर्वजन्माची स्मृति व यक्षयोनीची प्राप्ति

त्या दोघींनीं त्याला वाड्यांत नेलें. त्याचें योग्य तें आदरातिथ्य केलें व फलाहार झाल्यानंतर त्यांच्यापैकीं एक सांगूं लागली. " महाराज ! पूर्वी प्रतिष्ठान शहरांत कालगर्भ नांवाचा एक ब्राह्मण रहात होता. पथ्या व बला या नांवाच्या आपल्या बायकांसह त्यानें सुखानें संसार केला. वृद्धापकाळीं एकमेकांचे वियोग होणार या कल्पनेनें सर्वांना दुःख झालें. वियोगाचें दुःख कोणालाहि होऊं नये म्हणून जन्मोजन्मीं आपलें हेंच नातें असावें अशी प्रार्थना करून त्यांनीं एकाच वेळीं अग्नीमध्यें आपल्या देहांची

आहुति दिली. त्यांचें एकमेकांवरील प्रेम पाहून अग्नीनें 'तथास्तु' म्हणून वर दिला. कालगर्भ ब्राह्मण 'दीप्तिशिख' नांवाचा एक यक्ष बनला आणि पथ्या व बला या धूमलेखा व ज्योतिलेखा या नांवाच्या यक्षकन्या बनल्या. त्यांनीं आपल्याला अनुरूप पति मिळावा म्हणून शंकराची उपासना केली. प्रसन्न झालेल्या शंकरांनीं त्यांची इच्छा ओळखली व ते म्हणाले, " मुलींनो ! पूर्वजन्मीं तुम्हीं ज्याच्याबरोबर अग्निप्रवेश केला तो तुमचा पति यक्षलोकांतच दीप्तिशिख नांवानें जन्माला आला आहे. पण आपला थोरला भाऊ अट्टहास याच्याबरोबर खेळत असतां त्याच्या हातून चुकून नलकूबराचा अपराध घडला म्हणून नलकूबरानें त्याला शाप दिला. त्यामुळें तो मृत्युलोकावर 'श्रीदर्शन' या नांवानें जन्माला आला. जन्मोजन्मीं तोच पति मिळावा अशी अग्नीची तुम्ही प्रार्थना केल्यामुळें तुम्हांलाहि त्यासाठीं, तुमचा अपराध नसतांनाहि, मृत्युलोकांत जन्म घ्यावा लागेल." असें म्हणून शंकर अंतर्धान पावले व धूमलेखा आणि ज्योतिलेखा यांनी पद्मिष्ठा व अनंगमंजिरी याच्या रूपानें मृत्युलोकांत जन्म घेतला. योग्य वेळीं त्यांचें श्रीदर्शनाशीं लग्न झालें. त्यांचा काळ सुखानें चालला असतां अट्टहास यक्षानें ब्राह्मणाचें रूप घेतलें व ' ज्योतिलेखा व धूमलेखा यांनीं युक्त असा जो दीप्तिशिख अग्नि तो अट्टहास करणाऱ्या कालभैरवानें नष्ट केला ' असें द्व्यर्थी वाक्य उच्चारून त्यांना पूर्वजन्मींची आठवण करून दिली. पद्मिनी व अनंगमंजिरी यांना पूर्वजन्मांची आठवण होऊन त्यांनीं तेथेंच आपला मनुष्यदेह टाकला व त्या यक्षिणी बनल्या. त्यांच दोन यक्षिणी आम्ही आहोंत." त्यांच्याकडून हा सर्व उलगडा झाल्यावर श्रीदर्शनाला आपल्या पूर्वजन्मींची आठवण झाली व तोहि मनुष्यदेह टाकून दीप्तिशिख नांवाचा यक्ष बनला व धूमलेखा व ज्योतिलेखा नांवाच्या त्या यक्षिणींबरोबर आनंदानें यक्षलोकाला निघून गेला.

नों. दि.